07 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सुरेश द्वादशीवार : डॉ. जयसिंगराव पवार लिखित अनुवादित ग्रंथांचे प्रकाशन

# ...माणुसकी नाकारणे शाहू विचारांशी द्रोह ठरेल

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : 'आर्थिक व धार्मिक विषमतेच्या आधारे माणुसकी नाकारल्यास तो राजर्षी छत्रपती शाहू राजांच्या विचाराशी द्रोह ठरेल', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांनी आज येथे केले. जगातले सर्व धर्म लबाडीवर उभे असून राजसत्ता व तथाकथित बुद्धिमंतांच्या सत्ता एकत्र आल्यावर उच्च दर्जाच्या लबाड्या केल्या जातात, असेही त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित राजर्षी शाहू चरित्राच्या रशियन व इटालियन अनुवादित ग्रंथांच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते ग्रंथांचे प्रकाशन झाले. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज प्रमुख उपस्थित, तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्र व महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने शाहू सिनेट हॉलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शाहू चरित्राच्या रशियन व इटालियन अनुवाद ग्रंथांचे प्रकाशन करताना श्रीमंत शाहू छत्रपती महाराज व सुरेश द्वादशीवार. शेजारी डावीकडून अ‍ॅड. श्रीपतराव शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. मेघा पानसरे.

द्वादशीवार म्हणाले, 'शाहू महाराज अद्‌भुत व्यक्तिमत्त्व होते.' प्रत्येक संघर्षात त्यांचा ध्वज फडकत राहिला. त्यांनी केलेल्या लोकाभिमुख कार्यामुळे त्यांची प्रतिमा लोकांच्या मनात ठळक आहे. पंचगंगा नदी घाटावर त्यांच्या दक्षिणेवर जगणारा माणूस त्यांना वेदोक्त मंत्रांचा अधिकार नाही, असे म्हणून अवमान करतो. त्या वेळी त्यांनी केलेला संघर्ष असत्याच्या परंपरेशी होता. तो ब्राह्मण अथवा धर्माशी नव्हता. वेदोक्त प्रकरण म्हणजे धर्माची गुलामगिरी आहे. ती कपोलकल्पित गोष्टी सांगून लादलेली आहे. मूळ महाभारतात आठ ते साडेआठ हजार श्लोक होते. आता ते एक लाख आहेत. अशा प्रकरणांच्या मुळाशी जाऊन त्यातील वास्तव तपासता आले पाहिजे.'

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, 'आजच्या परिस्थितीत शाहू विचारांची नितांत आवश्यकता आहे. रशियन भाषेत तो दोन वर्षांपूर्वी अनुवादित झाला असता, तर रशिया विरूद्ध युक्रेन यांच्यातील युद्ध टळले असते. अशी ताकद शाहू राजांच्या विचारांत आहे.'

डॉ. पवार म्हणाले, 'शाहू चरित्र म्हणजे धर्मनिरपेक्षता व राष्ट्रवादाचे प्रारूप आहे. शाहूंनी सामाजिक क्रांतीसाठी आयुष्य वाहिले. इटलीतील लोकशाही डळमळत असून, रशियात हुकूमशाही स्थापन झाल्याचे दिसत आहे. तिथल्या विचारवंत, प्राध्यापक, अभ्यासकांनी ग्रंथाचे वाचन करावे, ही अपेक्षा आहे.'

डॉ. मेघा पानसरे यांनी अनुवादाच्या प्रक्रियेची माहिती दिली. इटालियन अनुवादक डॉ. अलेस्सांद्रा कोन्सोलारो यांनी कार्यक्रमास दिलेल्या शुभेच्छांचा व्हिडिओ प्रदर्शित करण्यात आला. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अ‍ॅड. श्रीपतराव शिंदे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव, डॉ. अशोक चौसाळकर, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर उपस्थित होते.

### शाहूंचे कार्य देशाबाहेरही जावे हीच भावना

■ 'रशियन व इटालियन भाषेतील अनुवादित शाहू चरित्र दोन्ही देशांतील विद्यापीठे, विचारवंत, लेखक, प्राध्यापकांपर्यंत मोफत पोहोचवले जाणार आहेत. शाहू राजांच्या कार्याचे झेंडे येथे नाचवून उपयोग नाही. त्यांचे कार्य महाराष्ट्रासह देशाबाहेर जावे हीच भावना आहे', असे डॉ. पवार यांनी स्पष्ट केले. तसेच पंचवीस भाषांतील अनुभवादाचा कोटा पूर्ण करणार असल्याची ग्वाही दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 MAY 2023
तरुण भारत

# शाहूंचा विचार जगभर पोहोचवण्याची गरज

## सुरेश द्वादशीवार यांचे प्रतिपादन: शाहू महाराज चरित्रग्रंथाच्या रशियन, इटालियन अनुवादांचे प्रकाशन



**कोल्हापूर : शाहू महाराज चरित्रग्रंथाच्या रशियन व इटालियन अनुवादांचे प्रकाशन करताना श्रीमंत शाहू छत्रपती, सुरेश द्वादशीवार. सोबत श्रीपतराव शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. विलास शिंदे, डॉ. मेघा पानसरे.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शाहू महाराजांचे व्यक्तीमत्त्व अद्भुत होते. त्यांच्या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाचा जगाला परिचय करून देणारा हा अनुवाद प्रकल्प आहे. या माध्यमातून आपला माणूस मोठा करतो असे नव्हे, तर महाराष्ट्र मोठा करीत असतो. म्हणून अनुवादाचे काम महत्त्वाचे आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा नीतीमूल्याधिष्ठित राष्ट्रवादाचा विचार ग्रंथाच्या माध्यमातून जगभर पोहोचविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांनी केले.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित शाहू महाराजांच्या चरित्रग्रंथाच्या रशियन व इटालियन अनुवादांचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठात झाले. शाहू संशोधन केंद्र आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने शाहूंच्या स्मृतिदिनानिमित्त प्रकाशन सोहळा आयोजित केला होता. श्रीमंत शाहू छत्रपती प्रमुख पाहुणे होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते. तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रबोधिनीचे अध्यक्ष श्रीपतराव शिंदे उपस्थित होते.

द्वादशीवार म्हणाले, शाहू महाराजांनी आयुष्यात अनेक संघर्षांना तोंड देत विजय मिळविला व आपला ध्वज उंचावत ठेवला. त्यांनी पुकारलेला संघर्ष केवळ ब्राह्मणशाहीविरुद्धचा नव्हता किंवा धार्मिक संघर्षही नव्हता, तर त्यांनी तो असत्याशी मांडलेला संघर्ष होता. शाहू महाराजांनी जनतेला समानतेचा अधिकार दिला. त्यांनी स्वतःच्या वर्तनातून आपल्या नियमांची अंमलबजावणी केली. म्हणून शाहूंच्या विचारांची मूल्ये जगभर रुजवण्याची गरज आहे. श्रीमंत शाहू छत्रपती म्हणाले, शाहूचरित्राच्या रशियन आणि इटालियन भाषेतील अनुवाद महत्त्वाचा आहे. शाहूकार्य देशांच्या सीमा ओलांडून विदेशांतील नागरिकांमध्ये परिवर्तन घडवेल. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. पवार यांनी भारतीय व जागतिक भाषांमध्ये शाहूचरित्राच्या अनुवादाचा महाप्रकल्प हाती घेतला आहे. रशियन आणि इटालियन अनुवादक महिला आहेत. अनुवादाच्या उर्वरित प्रकल्पांमध्येही विद्यापीठ सक्रीय असेल, अशी ग्वाही दिली.

यावेळी डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, १५ भारतीय आणि १० विदेशी भाषांमध्ये शाहूचरित्राचा अनुवाद करण्याचा संकल्प आहे. भारतीय हिंदी, मराठी, कन्नड, कोकणी, तेलगू भाषांमध्ये प्रकाशित असून बंगाली, गुजराती, सिंधी अनुवाद तयार असल्याचे ते म्हणाले.

0 7 MAY 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

सुरेश द्वादशीवार : राजर्षी शाहू चरित्राचे रशियन, इटालियन अनुवाद ग्रंथाचे प्रकाशन

# शाहू महाराज जगाला समजण्यातच महाराष्ट्राचे मोठेपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शाहूंचे चरित्र जगभर पोहोचविण्यामुळे केवळ शाहू महाराजच नव्हे तर महाराष्ट्र मोठा होतो आहे, त्यांचे विचार जगाला कळणे यातच महाराष्ट्राचे मोठेपण आहे, असे गौरवोद्गार सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत, लोकमत नागपूरचे माजी संपादक प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी शनिवारी येथे काढले.

शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट सभागृहात राजर्षी शाहू चरित्राचे रशियन आणि इटालियन अनुवाद ग्रंथाचे प्रकाशन द्वादशीवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. या ग्रंथाचे डॉ. मेघा पानसरे व प्रा. तत्याना बिकवा यांनी रशियन भाषेत, तर डॉ. अलेस्सांद्रा कॉन्सोलारो यांनी इटालीयन भाषेत अनुवाद केला आहे.

प्रा. द्वादशीवार म्हणाले, राजसत्ता आणि तथाकथित बुद्धिवंतांची सत्ता एकत्र आल्या की उच्च दर्जाच्या लबाड्या होतात. त्या करणाऱ्यांचे पाप जेवढे मोठे होते, तेवढेच ते दडवणाऱ्यांचे आहे म्हणून खऱ्या इतिहासापर्यंत पोहोचू शकलो तरच शाहूंचा वेदोक्ताशी असलेला झगडा समजून घेता येईल. धर्मनिरपेक्ष किंवा निधर्मी राष्ट्रवाद हा शाहू महाराजांचा पिंड होता. म्हणून शाहू महाराजांच्या माणूस जोडणाऱ्या राष्ट्रवादाची भाषा आता बोलली पाहिजे.

यावेळी शाहू महाराज म्हणाले, रशियन ग्रंथाचे प्रकाशन वर्षभर आधी झाले असते तर रशिया आणि युक्रेन युद्ध टळले असते. शाहूंचा समता आणि मानवतेचा विचार जगाच्या कोनाकोपऱ्यात पोहोचल्यास जगभर सामाजिक परिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. विदेशी भाषा विभागाच्या डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, शाहूंचे हे ग्रंथ जगभरातील इतिहासाच्या अभ्यासकांसाठी साधन ग्रंथ म्हणून उपयुक्त ठरतील. रशियन अनुवाद करणाऱ्या प्रा. तत्याना बिकवा यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून त्यांना आदरांजली वाहिली. डॉ. पानसरे यांनी सभागृहात, तर डॉ. अलेस्सांद्रा कॉन्सोलारो यांनी इटलीमधून ऑनलाइन मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी शाहू महाराजांना अभिवादन करण्यात आले. प्रास्तविक शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले.

या समारंभास महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड. श्रीपतराव शिंदे, प्र-कुलसचिव डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, सुरेश शिपूरकर, प्रा. आनंद मेणसे, 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, डॉ. रमेश जाधव, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. विजय शिंदे, वसुधा पवार, प्राचार्य हरीष भालेराव, व्ही. बी. पाटील, प्रा. भारती पाटील, डॉ. मंजूश्री पवार, डॉ. जे. के. पवार, व्यंकाप्पा भोसले, नामदेवराव कांबळे आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या सभागृहात राजर्षी शाहू चरित्राचे रशियन आणि इटालियन अनुवाद ग्रंथाचे प्रकाशन 'लोकमत'चे माजी संपादक प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ॲड. श्रीपतराव शिंदे, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जयसिंगराव पवार, शाहू महाराज, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. मेघा पानसरे उपस्थित होते.

## जगभर पोहोचणार शाहू विचारग्रंथ

भावी पिढीसाठी जगभरातील निरनिराळ्या भाषेत शाहू चरित्र उपलब्ध व्हावेत म्हणून त्यांचे अनुवाद करण्याचा प्रकल्प शाहू संशोधन केंद्र आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीने हाती घेतला आहे. राज्याबाहेरील बहुजनांपर्यंत, तसेच विविध देशांच्या वकिलातींच्या माध्यमातून हे शाहूंचे विचार ग्रंथ रुपात विनामूल्य पोहोचवले जातील अशी माहिती डॉ. जयसिंगराव पवार यांनी दिली.

0 7 MAY 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंचा नीतिमूल्याधिष्ठित राष्ट्रवादाचा विचार जगभर जावा : द्वादशीवर

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा नीतिमूल्याधिष्ठित राष्ट्रवादाचा विचार ग्रंथानुवादाच्या माध्यमातून जगभर पोहोचवण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांनी शनिवारी येथे केले.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित शाहू महाराजांच्या चरित्र ग्रंथाच्या रशियन व इटालियन अनुवादांचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठात झाले. विद्यापीठाचे शाहू संशोधन केंद्र आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज प्रमुख पाहुणे होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



**कोल्हापूर : शाहू चरित्राच्या रशियन व इटालियन अनुवाद ग्रंथांचे प्रकाशन करताना श्रीमंत शाहू छत्रपती महाराज आदी. (छाया : पांडुरंग पाटील)**

होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व प्रबोधिनीचे अध्यक्ष श्रीपतराव शिंदे प्रमुख उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, डॉ. जयसिंगराव पवार यांनी भारतीय व जागतिक भाषांमध्ये शाहू चरित्राच्या अनुवादाचा महाप्रकल्प हाती घेतला आहे, ही फार मोलाची बाब आहे. रशियन आणि इटालियन अनुवादाच्या प्रक्रियेत गुंतलेल्या सर्व अनुवादक या महिला आहेत, ही शाहू कार्याला एक मोठीच आदरांजली आहे. अनुवादाच्या उर्वरित प्रकल्पांमध्येही शिवाजी विद्यापीठ सक्रिय सहभाग घेईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

तत्पूर्वी, डॉ. जयसिंगराव पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

कार्यक्रमास डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील, शाहू चरित्रकार डॉ. रमेश जाधव, डॉ. सुनीलकुमार लवटे, सुरेश शिपूरकर, वसंत भोसले, प्राचार्य आनंद मेणसे, डॉ. हरिश भालेराव, डॉ. जे. के. पवार, व्यंकाप्पा भोसले, नामदेवराव कांबळे, विजय शिंदे, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर यांच्यासह अनेक शाहूप्रेमी मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
07 MAY 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहूंचा नीतिमूल्याधिष्ठित राष्ट्रवादाचा विचार जगभर जावा

## सुरेश द्वादशीवार; विद्यापीठात शाहू चरित्राच्या रशियन, इटालियन अनुवाद ग्रंथांचे प्रकाशन




**कोल्हापूर : विद्यापीठात शाहू चरित्राच्या रशियन, इटालियन अनुवाद ग्रंथ प्रकाशनप्रसंगी बोलताना सुरेश द्वादशीवार. सोबत शाहू महाराज, श्रीपतराव शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. मेघा पानसरे.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा नीतीमूल्याधिष्ठित राष्ट्रवादाचा विचार ग्रंथानुवादाच्या माध्यमातून जगभर पोहोचविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांनी केले.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित शाहू महाराजांच्या चरित्रग्रंथाच्या रशियन व इटालियन अनुवादांचे प्रकाशन शनिवारी शिवाजी विद्यापीठात झाले. शाहू संशोधन केंद्र व महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम झाला. शाहू महाराज प्रमुख पाहुणे होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व प्रबोधिनीचे अध्यक्ष श्रीपतराव शिंदे प्रमुख उपस्थित होते.

द्वादशीवार म्हणाले, शाहू महाराजांचे व्यक्तिमत्त्व अद्‌भुत होते. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा जगाला परिचय करून देणारा हा अनुवाद प्रकल्प आहे. या माध्यमातून केवळ आपला माणूस मोठा करतो असे नव्हे तर महाराष्ट्र मोठा करीत असतो. म्हणून हे काम महत्त्वाचे आहे. शाहू महाराज माणसा-माणसांत फरक करू नका, कोणालाही माणुसकीचे अधिकार नाकारू नका, असे ते सांगत असत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, डॉ. जयसिंगराव पवार यांनी भारतीय व जागतिक भाषांमध्ये शाहूचरित्राच्या अनुवादाचा महाप्रकल्प हाती घेतला आहे ही मोलाची बाब आहे. रशियन आणि इटालियन अनुवादाच्या प्रक्रियेत गुंतलेल्या सर्व अनुवादक महिला आहेत, ही शाहूकार्यासाठी आदरांजली आहे. डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये १५ भारतीय आणि १० विदेशी भाषांत शाहूचरित्र घेऊन जाण्याचा संकल्प आपण सोडला. रशियन अनुवादक डॉ. मेघा पानसरे यांनी सभागृहात तर डॉ. अलेस्सांद्रा कॉन्सोलारो यांनी इटलीमधून ऑनलाईन स्वरूपात अनुवादामागील भूमिका स्पष्ट केली. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील, शाहू चरित्रकार डॉ. रमेश जाधव, डॉ. सुनीलकुमार लवटे, सुरेश शिपूरकर, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर आदी उपस्थित होते.

### ...तर युक्रेनवरील हल्ला टळला असता!

राजर्षी शाहूंचे कार्य देशाच्या सीमा ओलांडून विदेशांत जाते आहे, ही बाब महत्त्वाची आहे. त्यामुळे तेथील नागरिकांत चांगले परिवर्तन होईल, अशी आशा शाहू महाराज यांनी व्यक्त केली. हे चरित्र वर्षभरापूर्वी आले असते आणि पुतीन यांनी वाचले असते तर कदाचित युक्रेनवरील हल्लाही टळला असता, अशी मार्मिक टिप्पणी त्यांनी केली.

0 7 MAY 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू महाराजांसाठी कोल्हापूर १०० सेकंद झाले स्तब्ध



राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याभोवती जमा होऊन शिवाजी विद्यापीठ परिवाराने १०० सेकंद स्तब्धता पाळत शाहू महाराजांना अभिवादन केले.

07 MAY 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह समस्त शिवाजी विद्यापीठ परिवार लोकराजा शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्व सांगतानिमित्त १०० सेकंद स्तब्ध राहून अभिवादन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याभोवती जमला.

0 7 MAY 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकराजाला अभिवादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ लोकराजा शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्व सांगतानिमित्त १०० सेकंद स्तब्ध राहून अभिवादन करण्यासाठी जमलेले कुलगुरू यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, प्राध्यापक व विद्यार्थी. (छाया : नाज ट्रेनर)

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात लोकराजाला अभिवादन

१ लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा १०१ वा स्मृतिदिन आणि कृतज्ञता पर्व सांगतेनिमित्त शनिवारी सकाळी १० वाजता १०० सेकंद स्तब्ध उभे राहून शिवाजी विद्यापीठ परिवाराने शाहू महाराजांच्या स्मृतींना अभिवादन केले.

२ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह सर्व अधिकारी, अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक हे विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या भोवती जमा झाले. तेथेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची प्रतिमाही ठेवली होती.

३ या दोन महापुरुषांना अभिवादन करून १० वाजता १०० सेकंदांसाठी सर्व उपस्थितांनी स्तब्धता पाळून कृतज्ञता व्यक्त केली. अभिवादन कार्यक्रमानंतर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार उपस्थित होते.

पुढारी

## शिवाजी विद्यापीठ

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा १०१वा स्मृतिदिन व कृतज्ञता पर्व सांगता या निमित्ताने शनिवारी सकाळी १० वाजता १०० सेकंद स्तब्ध उभे राहून शिवाजी विद्यापीठासह शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापकांनी शाहू महाराजांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करत आदरांजली वाहिली.

जिल्हा प्रशासनाने केलेल्या आवाहनानुसार शनिवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह अधिकारी, अधिष्ठाता, अधिविभाग प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या भोवती जमले. राजर्षी शाहू महाराज यांची प्रतिमा ठेवण्यात आली होती. महापुरुषांना अभिवादन करून १० वाजता १०० सेकंदांसाठी सर्व उपस्थितांनी स्तब्धता पाळून शाहू महाराजांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. डी. के. मोरे आदी उपस्थित होते. अभिवादन कार्यक्रमानंतर मुख्य प्रशासकीय भवनामध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 7 MAY 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ, डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन व डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी यांच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव तसेच विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते. यावेळी असो. ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजचे माजी अध्यक्ष प्रा. एम. एम. साळुंखे यांचे 'डॉ. आप्पासाहेब पवार काल व कर्तृत्व' यावर व्याख्यान झाले.

पुण्यनगरी

# राजर्षी शाहूंनी माणसं उभी केली : डॉ. पाटील

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनात अनेक संघर्षाचे प्रसंग आले. या संघर्षावर मात करत त्यांनी गोरगरीब आणि सामान्य, तसेच मागासवर्गीय समाजातील अनेक माणसे उभी केली. शाहू महाराजांच्या माणूसपणाबद्दल जास्त बोलूया, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी केले. श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त राजर्षी यांच्या जीवनातील संघर्ष या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. सुरेश शिखरे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. जाधव यांनी करून दिली. प्रा. एस. डी. अपराध यांनी आभार मानले. सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय स्टाफ यावेळी उपस्थित होता.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात 'व्हॅल्युएशन' कोर्स सुरु

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग या केंद्राचा 'सर्टिफिकेट कोर्स इन व्हॅल्युएशन ऑफ इमुव्हेबल प्रॉपर्टी' हा अभ्यासक्रम डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेत शिकवला जातो. परीक्षा शिवाजी विद्यापीठमार्फत घेतली जाते. नुकत्याच संपलेल्या तुकडीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, त्यामध्ये डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा निकाल १०० टक्के लागला आहे. नवीन तुकडीसाठी प्रवेश सुरू आहेत.

सकाळ

# न्यू कॉलेजमध्ये ग्रंथालय व्यवस्थापन कोर्स

कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला आहे. शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून मान्यताप्राप्त असलेल्या कोर्ससाठी १० वी पास ही पात्रता असून कालावधी तीन महिन्यांचा आहे. या प्रमाणपत्र कोर्सचा उपयोग सार्वजनिक ग्रंथालये आणि अन्य क्षेत्रांतील ग्रंथालयात ग्रंथपाल होणेसाठी होऊ शकतो. इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश आणि अधिक माहितीसाठी १५ मे पूर्वी समन्वयक प्रा. डॉ. आर. पी. आडाव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

0 7 MAY 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा २५ मेपासून

## परीक्षा विभागाकडून सुधारित वेळापत्रक जाहीर; विद्यार्थ्यांना दिलासा

- परीक्षा : ५९० हून अधिक अभ्यासक्रम
- विद्यार्थी : २ लाख ५० हजार
- महाविद्यालये : २८६



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिलमध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्र परीक्षा २५ मे पासून सुरू होणार आहेत. याबाबतचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले आहे. पुढील नवीन शैक्षणिक वर्ष सुरळीत होण्यासाठी परीक्षांच्या तारखांमध्ये बदल केल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागाने यापूर्वी पदवी, पदव्युतर अभ्यासक्रमांच्या परीक्षा जूनमध्ये घेण्याचे नियोजन केले होते. त्यानुसार वेळापत्रक तयार केले, परंतु नवीन शैक्षणिक सत्र प्रारंभ व निकालाच्या दृष्टीने विद्यापीठाने परीक्षा अलीकडे घेतल्या आहेत. २५ मे पासून विद्यापीठाकडून बीए., बी.कॉम., बी.एस्सी., भाग-३, बीबीए, बीसीए, बीए बीएड (स्पेशल), बीएसडब्ल्यू, बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन अभ्यासक्रमांच्या परीक्षांना प्रारंभ होईल. या परीक्षा जुलै महिन्यापर्यंत चालणार आहेत. मार्च-एप्रिलमधील उन्हाळी सत्राच्या पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासक्रमांच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक लवकरच विद्यापीठाकडून जाहीर केले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने जाहीर केलेल्या सुधारित परीक्षा वेळापत्रकानुसारच नियोजन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

### एकाच दिवशी दोन परीक्षा नाहीत

स्वयंम परीक्षा, कंपनी सेक्रेटरी परीक्षा तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या आभियांत्रिकी, आर्किटेक्चर, औषधनिर्माणशास्त्र व इतर अभ्यासक्रमांच्या 'एमएचटी-सीईटी' परीक्षा व सार्वजनिक सुट्टीदिवशी विद्यापीठाकडून लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या जाणार नसल्याचे विद्यापीठाने परिपत्रकात स्पष्ट केले आहे.

पुढारी

# विद्यापीठाकडून ५३१ अभ्यासक्रमांचे निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर ५३१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठाचे हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बॅचलर ऑफ एज्युकेशन, मास्टर ऑफ फार्मसी, बी.एड.एम.एड. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षांच्या सुधारीत तारखा जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने मार्च-एप्रिलमध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्र परीक्षा २५ मे पासून सुरू होणार आहेत. याबाबतचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले आहे. पुढील नवीन शैक्षणिक वर्ष सुरळीत होण्यासाठी परीक्षांच्या तारखांमध्ये बदल केल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. तरी विद्यार्थ्यांनी सुधारीत परीक्षेच्या तारखांनुसार अभ्यास करावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे. विद्यापीठ परीक्षा विभागाने यापूर्वी पदवी, पदव्युतर अभ्यासक्रमांच्या परीक्षा जूनमध्ये घेण्याचे नियोजन केले होते. परंतु नवीन शैक्षणिक सत्र प्रारंभ व निकालाच्या दृष्टीने विद्यापीठाने परीक्षा अलीकडे घेतल्या आहेत. २५ मे पासून विद्यापीठाकडून बीए., बी.कॉम., बी.एस्सी., भाग-३, बीबीए, बीसीए, बीए बीएड (स्पेशल), बीएसडब्ल्यू, बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन अभ्यासक्रमांच्या परीक्षांना प्रारंभ होईल. या परीक्षा जुलै महिन्यापर्यंत चालणार आहेत. मार्च-एप्रिलमधील उन्हाळी सत्राच्या पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रथम आणि व्दितीय वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाणार आहे.